# ..विवाह नोंदणीविषयी..

- विवाह नोंदणी हे सामाजिक कर्तव्य आहे.
- राज्यात दोन पध्दतीने विवाहाची नोंदणी केली जाते.

1. विशेष विवाह कायदा, 1954 या कायद्यांतर्गत विशेष विवाह संपन्न करुन त्याचे प्रमाणपत्र दिले जाते.
2. वैदिक अथवा पारंपरिक पध्दतीने संपन्न झालेल्या विवाहाची नोंदणी करण्यासंदर्भात महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 हा कायदा अस्तित्वात आहे.

- विशेष विवाह कायदा, 1954 अंतर्गत विवाह संपन्न करण्याकरिता या कायद्यातील कलम 4 मध्ये नमूद अटींची पूर्तता केल्यानंतर कलम 5 अन्वये विशेष विवाह संपन्न करता येतो.
- तसेच इतर पध्दतीने अगोदरच झालेल्या विवाहांची नोंदणी विशेष विवाह कायद्यातील कलम 15 मधील तरतुदीची पूर्तता केल्यावर कलम 16 प्रमाणे करता येते.
- विशेष विवाह कायद्यांतर्गत संपन्न करावयाचा विवाह हा विवाह कार्यालयाव्यतिरिक्त घरी/अन्य ठिकाणी देखील संपन्न करता येतो.
- महाराष्ट्र राज्यात मुंबई शहर, मुंबई उपनगर व पुणे या ठिकाणी स्वतंत्र विवाह नोंदणीची कार्यालये आहेत तसेच सर्वसाधारणपणे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात विवाह नोंदणीची कार्यालये आहेत.
- सद्यःस्थितीत वैदिक/धार्मिक पध्दतीने संपन्न झालेल्या विवाहांची नोंदणी स्थानिक स्वराज्य संस्थेकडील अधिका-यांकडून केली जाते.
- मा. सर्वोच्च न्यायालयाने श्रीमती सीमा विरुध्द अश्विनकुमार (ट्रान्सफर पिटीशन क्र.291/05) प्रकरणामध्ये विवाहांची नोंदणी करणे अनिवार्य असल्याचा निर्णय दिला.
- विवाहाची नोंदणी केली नाही एवढया कारणास्तव विवाह बेकायदेशीर ठरत नाही. मात्र त्यामुळे विवाह झाल्याचा कोणताही शासकीय पुरावा संबंधितांकडे राहत नाही. तसेच शासकीय अभिलेखात विवाह झाल्याबाबतची नोंद घेण्याबाबत अडचणीचे ठरते.
- महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 या अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी करण्याचे अधिकार सार्वजनिक आरोग्य विभागास आहेत.